दै. सकाळ दि.08/08/2022

# गावठी पिस्टलसह तीन आरोपींना अटक



नांदेड : स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पिस्टलसह तीन आरोपींना अटक करून नांदेड ग्रामीण ठाण्याच्या ताब्यात दिले.

**नांदेड, ता.७ (बातमीदार)** : अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यासाठी पोलिस प्रशासना कंबर कसली असून, शनिवारी (ता.सहा) रात्री स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गावठी पिस्टलसह तीन आरोपींना अटक केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना ढवळे कॉर्नर ते उस्माननगर रोडवर एक व्यक्ती स्वतःच्या जवळ पिस्टल बाळगून असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला रवाना केले. तेथे त्यांनी आरोपी शितीज प्रतापराव मोरे (वय १९, रा.सिडको) याची झडती घेतली असता त्याच्या कमरेला एक पिस्टर मिळून आले. याबाबत विचारले असता त्याने शुभम अनिलराव कदम (वय २१, रा.जानापुरी) आणि संतोष प्रभाकर कदम (वय २१, रा. डेरला) यांनी सदर पिस्टल दिल्याचे सांगितले. त्यावरून तीन्ही आरोपींना शस्त्रांसह अटक करून पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीणमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला.

दै. सामना दि. 8.8.2022

# गावठी पिस्टलसह तिघे ताब्यात

नांदेड, दि. ७ (प्रतिनिधी) – गावठी पिस्टलसह तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले असून त्यांना ग्रामीण पोलिसांच्या हवाली करण्यात आले.

शहरातील ढवळे कॉर्नर ते उस्माननगर मार्गावर एक जण पिस्टल बाळगून असल्याची माहिती मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या पथकाने ढवळे कॉर्नर ते उस्माननगर मार्गावर पेट्रोलपंपाजवळ क्षितिज प्रताप मोरे (रा. टेळकी, ता. लोहा) यास ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे गावठी पिस्टल आढळून आले. पोलिसांनी पिस्टलबाबत विचारणा केली असता हे पिस्टल शुभम अनिल कदम (रा. जानापुरी) व संतोष प्रभाकर कदम (रा. डेरला) यांच्याकडून घेतल्याची माहिती क्षितिज याने दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुभम कदम व संतोष कदम या दोघांना ताब्यात घेऊन ग्रामीण पोलिसांच्या हवाली केले. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, पोलीस हवालदार सुरेश घुगे, बालाजी तेलंग, विलास कदम, गणेश धुमाळ, तानाजी येळके, देवा चव्हाण, बालाजी यादगीरवाड, दीपक ओढणे, सिटीकर, दासरवाड व हेमंत बिचकेवाड यांच्या पथकाने पार पाडली.